CNR NO.MHSO060004602011

**विशेष दिवाणी दावा क्र.१२९/२०११**

कमलाकर साळुंखे, वगैरे

**वि.**

बाबुराव जवळेकर, वगैरे

## निशाणी क्रमांक १९४ व १९९ वरील एकत्रीत आदेश

प्रस्तुतचे अर्ज वादींनी प्रतिवादी क्र.२ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होवुन वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादींचे कथन आहे की, प्रतिवादी क्र.२ ही मयत असल्याचा दाखला दि.०६.०८.२०२४ रोजी दाखल केला त्यावेळेस प्रतिवादी क्र.२ मयत झाल्याची बाब वादीस कळाली. त्यामुळे वादीने त्वरीत प्रस्तुतचा अर्ज हा मयताचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होण्यासाठी दाखल केलेला आहे. तसेच अर्ज निशाणी क्र.१९४ द्वारे वादी हे मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दुरुस्तीची परवानगी मागतात.

२. निशाणी क्र.१९९ या अर्जाची नोटीस प्रस्तावित वारसांना काढण्यात आली. त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले. त्यांनी व इतर प्रतिवादींनी म्हणणे मांडले की, प्रतिवादी क्र.२ मयत झाल्याची बाब वादींना मा. उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिकेत झालेली होती. तरी देखील वादींनी वारस अभिलेखावर आणण्यासाठी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. विलंबाबाबत संयुक्तिक कारण नमुद नाही. दावा करारपूर्तीचा आहे. करिता, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. दावा करारपूर्तीसाठी दाखल करण्यात आलेला आहे. वादींचे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दि.१६.१२.२००१ रोजी वादमिळकती इसार पावती/साठेखत वादीस लिहून दिले. त्यामुळे करारपूर्तीसाठी प्रस्तुतचा दावा दाखल आहे. सदरील बाब पाहता प्रतिवादी क्र.२ चे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. वादींनी विलंबाबाबत कारण केवळ एवढेच नमुद केले की, प्रतिवादींनी पुरसीस देवुन प्रतिवादी क्र.२ मयत असल्याचे कळविल्याने व मृत्युचा

दाखला दि.०६.०८.२०२४ रोजी दाखल केला ही बाब पाहता वादींना प्रतिवादी क्र.२ चा मृत्यु दि.०६.०३.२०२० रोजी झाल्याचे आढळले. सदरील बाबीस प्रतिवादींनी म्हणणे मांडले की, मा. उच्च न्यायालयात दाखल याचिकेमध्येच सदरील बाब वादींच्या निदर्शनास आलेली होती. दोन्ही बाजुंचा आक्षेप विचारात घेता व दाव्याचे स्वरुप पाहता दावा गुणवत्तेवर चालविण्याकामी वादींना परवानगी देणे आवश्यक आहे असे वाटते. मयत प्रतिवादी क्र.२ चे इतर वारस प्रतिवादी क्र.१ व प्रतिवादी क्र.३ हे सुरुवातीपासुन दाव्यात पक्षकार आहेत. त्यामुळे उर्वरित वारसांची नांवे अभिलेखावर न घेतल्यास दाव्यात तांत्रीक अडचण येवू शकते. दाव्यातील वादी व प्रतिवादी यांनी मा. उच्च न्यायालयात वेगवेगळ्या अर्जाच्या अनुषंगाने वारंवार दाद मागितलेली आहे. त्यामुळे दाव्याचा गुणवत्तेवर निकाल होणेकामी खर्च रकमेवर अर्ज मंजुर करणे योग्य होईल. करिता, खालील आदेश.

## <u>आदेश</u>

१. अर्ज निशाणी क्र.१९४ व १९९ हे रक्कम रु.३,०००/- (अक्षरी रु.तीन हजार) खर्चावर मंजूर करण्यात येतात.

२. प्रतिवादी क्र.२ चे उर्वरित वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब याद्वारे माफ करण्यात येतो.

३. वादींनी विहित कालावधीत दाव्यामध्ये प्रस्तावित दुरुस्ती करुन प्रतिवादी क्र.२ च्या उर्वरित वारसांना दाव्यात प्रतिवादी म्हणुन सहभागी करावे. तशी दुरुस्ती केल्यानंतर दुरुस्त दाव्याची प्रत व हुकूमनाम्याकरिता प्रत वादींनी पक्षकारांच्या सहीसह न चुकता विहित कालावधीत दाखल करावी.

४. नव्याने समाविष्ठ प्रतिवादी यांचेवर दाव्याचे समन्स बजावणीकामी वादींनी योग्य ती कार्यवाही करावी.

NILESH SUBHASH BUDRUK
Digitally signed by NILESH SUBHASH BUDRUK
Date: 2025.06.24 12:57:50 +0530

(नीलेश सु. बुद्रुक)

दि. २१.०६.२०२५

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
पंढरपूर.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file are same word to word as per the original.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Suresh M. Malkapalli |
| (b) | Court | : | Jt. Civil Judge (S.D.), Pandharpur. |
| (c) | Signed by P.O. On | : | 21.06.2025 |
| (d) | Uploaded on | : | 24.06.2025 |